सं.फौ.ख.क्र.५५१/२०२२
सरकार वि..रमेश
नि.क्र.१० च्या खाली

साक्षीदार क्र ०१ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–विजय सिताराम गायगव्हाने
वय ४५ वर्ष, व्यवसाय–शेती
राह.बोथली, तह.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी समंन्स पत्र दिले हाते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी क्र.१३** देण्यात आला. त्यानंतर मी पंचनामा करण्याकामी घटनास्थळावर गेलो होतो व पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता व त्यातील मजकूर पोलिसांनी मला वाचुन समजुन सांगितला होता. सदर पंचनामा हा अपघात झाल्याबाबत होता. घटनास्थळवर मला एक दुचाकी व एक चारचाकी वाहण दिसले. त्यावेळी दुचाकी वाहण हे चारचाकी वाहणामध्ये घुसुन होते व रस्त्यावर रक्ताचे डाग होते व टायरचे निशान होते. पोलिसांनी माझ्यासमक्ष दुचाकी व चारचाकी वाहण जप्त केले होते. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानि क्र.१४** देण्यात आला. आता मला एकुण १८ फोटो दाखविण्यात आले त्यामध्ये माझा फोटो आहे त्यास **आर्टीकल ए–१ ते ए–१८** देण्यात आले.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.पी.वाय.सुखदेवे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.**

२. पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्याकामी किती वाजता समन्स दिले होते त्याची वेळ मला आठवत नाही. घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही ज्या पोलिसांनी घेतली होती त्याचे नाव मला सांगता येते, त्यांचे नाव कुणाल ठाकरे असे होते. पोलिसांनी मला समन्स बोथली गावात दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी मानोरी येथे गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मला मानोरी या गावी पोलिसांनी समन्सपत्र दिले नव्हते. घटनास्थळ पंचनामा ज्यांनी तयार केला त्यांचे नाव मला सांगता येते, त्यांचे नाव वाघोडे असे होते.

३. उमरेड ते बेला या रस्त्यावर नेहमी वर्दळ असते. पोलिसांनी मला समन्सपत्र

देण्यासाठी फोन करून बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांकडे माझा फोन नंबर होता. घटनास्थळ पंचनामा किती वाजता सुरू केला व किती वाजता संपला याची वेळ मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामाच केला नव्हता त्यामुळे मला घटनास्थळ पंचनामा तयार केल्याची वेळ माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी आधीच तयार केलेल्या पंचनाम्यावर मी फक्त सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलिसांनी कोणताही पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि. १६/०८/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड